**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**विषय:- अभियंता वर्ग १ दर्जा व वेतनश्रेणी असलेल्या मनपा कार्यालयीन कामाकरिता स्वत:चे खाजगी वाहन वापरणे बाबत वाहन समितीची मान्यता घेऊन त्यांना अनुज्ञेय असलेला वाहनभत्ता लागू करणे बाबत..**

**प्रस्तावना :-**

उपरोक्त विषयान्वये मनपा आस्थापनेवर कार्यरत असलेले १) उप-अभियंता स्थापत्य/पाणीपुरवठा श्री एजाज खान अन्वर खान घोरी, २) श्री सचिन एकनाथ नाईक, ३) श्री उध्दव तुकाराम गावडे ४) श्री वसीम अहमद शेख, ५) श्री हरेश हाडको म्हात्रे, ६) श्री सरफराज तजमुल्ल अन्सारी, ७) श्री जमसु वसंत वळवी, ८) श्री विनोद अरुण भोईर, ९) उप- अभियंता (यांत्रिको श्री संदीप गणेश पटणावर, सदर अधिकारी वर्ग - १ चा पदाचा दर्जा मिळाल्यापासून मनपा कार्यालयीन कामाकरिता स्वत:चे खाजगी वाहन वापरत असल्याने त्यांना अनुज्ञेय असलेला वाहनभत्ता मिळणे कामी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सदर अधिकारी यांना मा. महासभा ठराव क्र. १०. दि. १७/०६/२००९ अन्वये महानगरपालिका कार्यालयोन कामाकरिता स्वत:चे खाजगी वाहन वापरणे बाबत परवानगी देणे व त्याकरिता अनुज्ञेय असलेला वाहनभत्ता लागू करणे बाबत वाहन समितीची दि. २०/१२/२०२४ रोजी दुपारी ४:३० वाजता कॉन्फरन्स हॉल, तिसरा मजला येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

सदर बैठकित मनपाचे सर्व वर्ग-१ चे अभियंता यांनी वाहन भत्याची मागणी केली आहे. त्याबाबत चर्चा झाली मनपा मा. महासभा ठराव क्र.१० दि.१७/६/२००९ नुसार मनपा अधिका-यास दरमहा ठोक वाहन मत्ता १५,०००/- हजार मान्य केले आहे. परंतु सद्यस्थितीत वाहनाचे दर तसेच पेट्रोलच्या दरात खुपच वाढ झाली आहे.

तरी सदर परिस्थतीतीचा आढावा घेऊन तसेच इतर महानगरपालिकेशो चर्चा करुन वाहन भत्ता वाढवणे योग्य राहील. तरी सन २००९ च्या तुलनेनुसार सन २०२४ चे पेट्रोल दर व वाहनाची किमत पाहता रक्कम रु. ४३,७१४/- रुपये वाहन भत्ता अपेक्षित आहे.

ठाणे जिल्ह्यातील इतर महानगरपालिका चौकशी केली असता नवि मुंबई महानगरपालिकेत रक्कम रुपये २९,०००/- वाहन भत्ता मंजूर केला आहे. तरी आपल्या मनपाची आर्थिक परिस्थीतीनुसार सदर वाहन भत्ता रक्कम रुपये २५,०००/- मंजुरी देण्यास मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.२०/१२/२०२४ रोजीच्या वाहन समितीच्या बैठकीमध्ये जा.क्र.भिनिशमनपा/वाहन/३४५/२०२४ दि.२०/१२/२०२४ नुसार मान्यता प्रदान केली आहे.

मनपाचे सर्व वर्ग-१ चे अभियंता ना प्रति माह वाहन भत्ता रु.२५,०००/- अदा करणे कामीच्या प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दि.२०/१२/२०२४ रोजी मान्यता प्रदान केली असुन त्यास मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा.महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** **दिनांक :-** 20/12/2024

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे सर्व वर्ग -१ चे अभियंता यांना प्रति माह रु.२५,०००/- अदा करणे कामीच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक**